# वसई-विरार शहर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय विरार

दि.१३/०८/२०२४

**<u>तिरंगा रन च्या माध्यमातून दिला घरोघरी तिरंगा ध्वज फडकवण्याचा संदेश,लहानांपासून थोरांपर्यंत नागरिकांनी घेतला सहभाग</u>**

घरोघरी तिरंगा अभियान अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिके तर्फे तिरंगा रन ही 3 किमी ची मॅरेथॉन स्पर्धा आज विरार येथे संपन्न झाली. या स्पर्धेला वसई विरार शहर महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारत येथून सुरुवात झाली. ती म्हाडा कॉलनी विरार पश्चिम परिसर येथून विरार जकात नाका वरुन पून्हा महापालिका मुख्यालय येथे पूर्ण झाली. महानगरपालिका अधिकारी, विरार वाहतूक पोलिस पतिनीधी, क्रीडा शिक्षक यांनी झेंडा दाखवून स्पर्धेला सुरुवात केली. या स्पर्धेला शिक्षक, विद्यार्थी, नागरीक समवेत महापालिका अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

**मुख्य कार्यालय विरार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**